(iv) उमेदवाराच्या आईने तिच्या वडीलांकडील जमिनीचा वाटा असल्याबाबतचे रु.२०/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र सादर केल्यास, असा उमेदवार १२ गुणांचा अधिभार मिळण्यास तो पात्र राहील.

(v) **उमेदवारास सूचित करण्यात येते की, ७/१२ खसरा/उता-याच्या आवश्यक तेवढया सत्यप्रती प्रवेशाच्या वेळेस सोबत ठेवाव्यात.**

(vi) उमेदवाराच्या जमिनीच्या ७/१२ खसरा / उतारा-यामध्ये नोंदविलेल्या नावापेक्षा त्याच्या/तिच्या इयत्ता १२ वी च्या गुणपत्रक व प्रमाणपत्रामध्ये असलेले नाव भिन्न असल्यास, अशा उमेदवाराने त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(इ) उमेदवाराचे आई / वडील भूमिहीन शेतमजूर असल्यास, **तहसीलदार अथवा नायब तहसीलदार यांचे, सदर पालक भूमिहीन शेतमजूर असून त्यांचे उपजीविकेचे शेत मजुरी हेच साधन असल्याचे प्रमाणपत्र असावे.** सदर प्रमाणपत्र उमेदवाराच्या नावे असू नये. अशा प्रमाणपत्रधारकास 'शेतकरी' प्रवर्ग लागू होणार नाही. विहित नमुना **परिशिष्ट 'बी'** मध्ये सोबत जोडला आहे.

(एफ्) (i) **सन २००९-१० किंवा २०१०-११ या वर्षातील तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र**. या प्रमाणपत्राचा नमुना **परिशिष्ट 'सी'** येथे जोडला आहे. उमेदवार किंवा त्याचे / तिचे आई-वडील अथवा आजी/आजोबा (वडिलांचे आई-वडील) हे शेतजमीनधारक किंवा कूळ असून त्या जमिनीवरील शेतीव्दारे मिळणारे उत्पन्न हेच त्या कुटुंबाच्या उपजीविकेचे प्रमुख साधन आहे, असे या प्रमाणपत्रामध्ये नमूद करणे आवश्यक आहे.

(ii) **उमेदवार मच्छीमार व्यवसाय करणाऱ्या कुटुंबातील असल्यास,** संबंधित तालुक्यातील तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले अशा आशयाचे प्रमाणपत्र. या प्रमाणपत्रात उमेदवाराच्या आई/वडिलांचे उपजीविकेचे मुख्य साधन मच्छीमारी हेच आहे असे नमूद केलेले असावे.

(जी) राज्यातील **सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.**

(एच्) **विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, क, ड , इतर मागासवर्गीय जाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांनी** सक्षम अधिकाऱ्याचे **दिनांक १/४/२०११ रोजी किंवा त्यानंतर दिलेले**

**किंवा अर्ज ज्या दिनांकास दिला असेल, त्या दिनांकास ग्राह्य असलेले 'उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (Non Creamy Layer)' प्रमाणपत्र.**

(आय्)महाराष्ट्र राज्यातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी, उमेदवार / वडील हे प्रकल्पग्रस्त आहेत व त्याच्या/तिच्या वडिलांची / पालकांची किंवा आजोबांची **शेतजमीन महाराष्ट्रातील** कृषी विद्यापीठे/ पाटबंधारे/ वीज /संरक्षण **प्रकल्पासाठी संपादित केलेली / झालेली आहे, असे प्रमाणपत्र.** सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या **प्रकल्पग्रस्ताच्या प्रमाणपत्रावर या सवलतीचा फायदा ज्याला द्यावयाचा आहे, त्याच्या नावाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.**

(जे) प्राधिकृत समादेशकाने दिलेले **राष्ट्रीय छात्र सेना 'बी'** किंवा **'सी'** हवाई दल/ नौदल / स्थलसेना विभागाचे **प्रमाणपत्र.**

(के) (i) **इ.११ / १२ वी मध्ये जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडा/ खेळ स्पर्धांमध्ये प्रतिनिधीत्व** करणाऱ्या उमेदवारांनी सादर केलेले **जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे प्रमाणपत्र.**

(ii) **नवोदय विद्यालयातील विद्यार्थ्यांबाबत भारतीय क्रीडा महासंघाच्या (SGFI)** वतीने दिलेले आणि **जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीचे प्रमाणपत्र.**

(iii) **क्रीडा संघटनेमार्फत दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही.**

(iv) वादविवाद, निबंध स्पर्धा, वक्तृत्व या **राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये भाग घेतला असल्याबाबतचे प्रमाणपत्र.**

(एल्) अर्जदाराच्या आई / वडिलांचे **स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे मा. पंतप्रधान / मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र.** स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा / मुलगी किंवा त्यांचा मुलगा / मुलगी यांना या प्रमाणपत्राचा फायदा मिळेल; परंतु अशा परिस्थितीत **अर्जदाराने रु. १००/- च्या मुद्रांकावर खालील मुद्यांचा समावेश असलेले प्रतिज्ञापत्र.**

(१) उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाच्या मुलाचा / मुलीचा मुलगा/ मुलगी आहे.

(२) **स्वातंत्र्यसैनिकाने या सवलतीचा उपयोग यापूर्वी कोणत्याही नातेवाईकासाठी केलेला नाही** आणि आता उपयोग केल्यानंतर तो पुढे करणार नाही.

वरील मुद्यांसंबंधात काही शंका, तक्रारी, अडचणी असल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी प्रचलित शासन निर्णयाचा संदर्भ घ्यावा.

(एम्) **सक्षम प्राधिका-याने दिलेले राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमाणपत्र.**

(एन्) **उमेदवाराचे वडील, सैनिक असल्यास** तशा आशयाचे **जिल्हा सैनिक बोर्ड किंवा संबंधित तुकडीचा प्रमुख सेनाधिकारी यांचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र** अथवा **डिस्चार्ज प्रमाणपत्र.**

(ओ) **सेवेत असणा-या उमेदवारांसाठी संबंधित नियुक्ती अधिकाऱ्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र'.**

(पी) **उमेदवाराचे आई / वडील, कृषी परिषद / कृषी विद्यापीठाचे** आजी/ माजी अथवा मृत सेवक असल्यास, **संबंधित कार्यालय प्रमुख किंवा नियंत्रण अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.**

(क्यु) जम्मू-काश्मीर या राज्यातील **विस्थापित झालेल्या उमेदवारांनी** शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. एजीयु-२०९५/२३१०६/सीआर-१८१/१९-अे, दिनांक ५/९/१९९६ मधील तरतुदीनुसार **सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र** अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. माहिती पुस्तिकेमध्ये सदरचा शासन निर्णय **परिशिष्ट 'डी'** येथे जोडला आहे. फक्त विस्थापित असल्याबाबतचे कोणत्याही प्रकारचे प्रतिज्ञापत्र ग्राहय धरले जाणार नाही.

(आर) शारीरिकदृष्टया अपंगत्व प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराने **प्राधिकृत अधिका-याचे** (जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समतुल्य शासकीय रूग्णालय / वैद्यकीय मंडळ) **अपंगत्वाबद्दलचे प्रमाणपत्र** जोडावे.

(एस्) **आर्थिकदृष्टया मागास वर्गातील उमेदवारांनी संबंधित तहसीलदारांचे दि.१ जानेवारी,२०११ रोजी किंवा त्यानंतर दिलेले आर्थिक मागास वर्गाचे प्रमाणपत्र.** (सदरची तरतूद फक्त केंद्रीय प्रवेश पध्दतीने कायमस्वरुपी विना अनुदानित महाविद्यालयात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनाच लागू राहील.)

(५) **सर्व दृष्टीने परिपूर्ण भरलेला तसेच प्रवेश वेळापत्रकात दिलेल्या शेवटच्या तारखेस किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेला अर्जच प्रवेशासाठी ग्राह्य धरला जाईल.**

(६) (i) **व्यवस्थापन कोट्यातून** प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या **अनिवासी भारतीय (NRI)** उमेदवाराने त्याचा अर्ज संबंधित विना अनुदानित महाविद्यालयाकडे / संस्थेकडे परस्पर पाठवावा.

(ii) अशा उमेदवाराला संबंधित संस्था / महाविद्यालय तात्पुरत्या स्वरुपात प्रवेश देईल.

(ii) अशा उमेदवाराची प्रवेशासाठीची पात्रता संबंधित विद्यापीठस्तरावरुन तपासून प्रवेश निश्चित केला जाईल.

(७) शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्र. एसटीसी-१००६/प्र.क्र.१०२/का.१०, दि.३०/८/२००६ नुसार व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी **'अनुसूचित जमाती'च्या उमेदवारांसाठी राखीव असलेल्या जागेवर प्रवेश देतांना हमीपत्र (Undertaking) घेण्याची कार्यपध्दती होती,** प्रस्तुत शासन परिपत्रक

**परिशिष्ट 'इ'** येथे जोडले आहे. तथापि, शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्र. एसटीसी-१००६/प्र.क्र.१०२/का.१०, दि.११/१/२०११ अनुसार **सदरची कार्यपध्दती रद्द करण्यात आली आहे,** प्रस्तुत शासन परिपत्रक **परिशिष्ट 'एफ्'** येथे जोडले आहे. त्यामुळे शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.एसटीसी-१०००/सीआर-२६१/डी-१०, दि.१/११/२००० मधील तरतुदीनुसार **अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी 'जात वैधता प्रमाणपत्र' सादर करणे आवश्यक आहे.** प्रस्तुत शासन निर्णय **परिशिष्ट 'जी'** येथे जोडला आहे.

(८) **खालीलपैकी कोणत्याही एका त्रुटीमुळे प्रवेश अर्जाचा विचार न करता तो आपोआपच रद्द समजण्यात येईल.**

(अ) **सक्षम प्राधिका-याने दिलेल्या अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्मतारखेच्या दाखल्याची सत्यप्रत जोडली नसल्यास.**

(ब) **प्रवेश अर्जाच्या संगणकावरून काढलेल्या प्रतीवर उमेदवाराने स्वतःची स्वाक्षरी केली नसल्यास.**

(क) प्रवेश अर्जावर **पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र चिकटविले नसल्यास.**

(ड) **पात्रता परीक्षेचे गुणपत्रक / श्रेणीपत्रकाच्या सत्यप्रती जोडलेल्या नसल्यास.**

(इ) **शाळा / महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याची सत्यप्रत अर्जासोबत जोडली नसल्यास,** (उमेदवाराने या प्रवेशापूर्वी दुसऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असेल तर त्या महाविद्यालयाने दिलेल्या बोनाफाईड प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश दिला जाईल; परंतु, मूळ महाविद्यालय सोडल्याचा दाखला प्रवेश घेतल्यापासून ३ महिन्यांच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.)

(फ) सेवेत असणा-या उमेदवाराने संबंधित **नियुक्ती प्राधिकाऱ्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' जोडले नसल्यास.**

(ग) **प्रवेश अर्जासोबत 'मज्ञाम' यांच्या नावाचा विहित स्थानी देय असलेला योग्य रकमेचा धनाकर्ष जोडला नसल्यास.**

(९) **गुणांच्या बाबतीत बरोबरी झाल्यास उमेदवारांचा गुणवत्ताक्रम (Merit Position) ठरविण्यासाठी अनुक्रमे खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात येईल.**

(अ) उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेतील उच्चतम गुणांची टक्केवारी.

(ब) कमीत कमी प्रयत्नांमध्ये उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.

(क) बी.बी.एम्. (कृषि) व बी.एस्सी. (ऑनर्स) (गृहविज्ञान) या शाखा वगळता, अन्य शाखांसाठी पीसीबी किंवा पीसीएम् किंवा पीसीबीएम् यापैकी लागू असलेल्या गटातील अधिकतम गुण,

(ड) इयत्ता १० वी मध्ये उच्चतम गुणांची टक्केवारी.

(इ) वयाने मोठा असलेला उमेदवार.

(१०) **प्रवेशअर्ज सादर केल्यानंतर कोणतीही <u>अतिरिक्त कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.</u>**

(११) **उमेदवारांनी** त्यांना पाहिजे असलेल्या महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्यासाठी **प्राधान्यक्रमाने अर्जामध्ये जास्तीत जास्त विकल्प नमूद करावेत.** त्यासाठी संबंधित महाविद्यालयाच्या सांकेतांकांचा वापर करावा. **एकदा नमूद केलेल्या <u>विकल्पात बदल करता येणार नाही.</u>**

(१२) (i) **उमेदवाराने सर्व रकान्यांमध्ये अचूक माहिती भरावी.**

(ii) उमेदवाराने भरलेल्या अर्जामध्ये कोणत्याही प्रकारची **<u>त्रुटी राहिल्यामुळे उमेदवाराची गुणवत्ता घसरल्यास,</u> त्याबाबत 'मझाम' किंवा कृषी परिषद जबाबदार राहणार नाही.**

(१३) अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर **गुणवत्ता यादीतील स्थान, उमेदवाराने दिलेले विकल्प, लागू असलेले आरक्षण आणि उपलब्ध जागा विचारात घेऊन प्रवेश दिले जातील.**

(१४) उमेदवाराने दिलेल्या **विकल्पानुसार प्रथमतः राज्यस्तरावरील ('एम' कोटा) उपलब्ध जागांमधून प्रवेशासाठी विचार केला जाईल. त्यानंतर विद्यापीठस्तरीय ('यु' कोटा) जागांवरील प्रवेशाबाबत विचार करण्यात येईल.**

(१५) प्रवेशासाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांची 'एम्' कोटा व 'यु' कोटयातील यादी प्रवेश वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांकांना **<u>www.mcaer.org</u>** & **<u>http://oasis.mkcl.org/agriug</u>** या संकेतस्थळांवर प्रसिध्द केली जाईल.

(१६) प्रवेशोच्छुक उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना **<u>परिशिष्ट 'एच्'</u>** मध्ये देण्यात आलेल्या आहेत.

(१७) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०११/(१०३)/११)/मशि-३, दि.१८/४/२०११ नुसार उमेदवाराने प्रवेश घेतेवेळी स्वच्छताविषयक बाबींसबंधी **<u>परिशिष्ट 'आय'</u>** मध्ये माहिती देणे अनिवार्य आहे.

## ४. प्रवेश कार्यपध्दती :

(१) उमेदवाराने प्रवेश प्रक्रियेसंबंधी माहितीपुस्तिकेत दिलेला सर्व मजकूर काळजीपूर्वक वाचावा.

(२) कृषी परिषद, पुणे ही राज्यातील कृषी विद्यापीठांकरिता 'मझ्राम', पुणे यांच्यामार्फत प्रवेशप्रक्रिया राबवील.

(३) महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ (१९८३ चा ४१) च्या कलम ५ मध्ये नमूद केल्यानुसार, पदवी प्रवेशासाठी उमेदवार आणि त्यांच्या आई/वडिलांचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य प्रवेश अर्ज दाखल करण्याच्या दिनांकाच्या १० वर्षे पूर्वीच्या कालावधीत किमान ३ वर्षे असणे आवश्यक असून असे उमेदवार प्रवेशासाठी पात्र समजण्यात येतील. तथापि, जे उमेदवार आणि त्यांच्या आई / वडिलांचे वास्तव्य मागील १० वर्षांच्या कालावधीत तीन वर्षांपेक्षा कमी असेल, असे उमेदवार राज्याबाहेरील उमेदवार म्हणून समजण्यात येतील व त्यांच्याकरिता प्रवेशांच्या जागा प्रवेश क्षमतेच्या २ टक्क्यापर्यंत मर्यादित असतील. (ही बाब मान्यताप्राप्त विना अनुदानित तत्वावरील संलग्न महाविद्यालयांसाठी लागू असणार नाही.)

(४) भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली व इतर राज्यातील उमेदवारांसाठी असलेल्या राखीव जागा वगळता उर्वरित जागांपैकी-

-- **३० टक्के जागा महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांसाठी खुल्या असतील ('एम्' कोटा)**
**आणि**

-- **७० टक्के जागा, या, उमेदवार ज्या विद्यापीठ कार्यक्षेत्रामधील महाविद्यालय/शाळा/संस्था येथून अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाला असेल, अशा उमेदवारांसाठी असतील ('यु' कोटा)**

**विना अनुदानित महाविद्यालयांमधील जागांचे वाटप खालीलप्रमाणे असेल.**

**(अ) प्रवेशक्षमतेच्या २० टक्के जागा व्यवस्थापन कोटा.**

**(ब) प्रवेश क्षमतेच्या उर्वरित ८० टक्के जागांपैकी-**

-- **३० टक्के महाराष्ट्र कोटा. ('एम्' कोटा)**
**आणि**

-- **७० टक्के जागा विद्यापीठस्तरीय कोटा ('यु' कोटा)**

(५) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील अधिवासी असून, त्याने उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा राज्याबाहेरून उत्तीर्ण केली असेल, अशा उमेदवाराचा प्रवेशासाठी विचार **फक्त 'एम्' कोटयाकरिता करण्यात येईल.**

(६) **जम्मू आणि काश्मीर या राज्यातील स्थलांतरित नागरिकांची मुले, लष्कर आणि लष्करसम व अखिल भारतीय दहशतवादविरोधी सेवा यामधील अधिकारी / कर्मचारी यांची मुले यांच्याकरिता** शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. एजीयु-२०९५/२३१०६/सीआर-१८१/१९-ए, दिनांक ५ सप्टेंबर, १९९६ व एजीयु-११९७/२८६८८/सीआर-९४/९७/१९-ए, दिनांक २७ ऑक्टोबर, १९९७ नुसार **पदवी अभ्यासक्रमासाठी प्रत्येक महाविद्यालयात मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा एक जागा अतिरिक्त भरण्यात येईल.** सदर शासन निर्णयांच्या प्रती, अनुक्रमे **परिशिष्ट 'डी' आणि 'जे'** येथे जोडल्या आहेत (संलग्न विना अनुदानित संस्थांखेरीज सर्व संस्थांना लागू). असे उमेदवार **http://oasis.mkcl.org/agriug** या संकेतस्थळावर अर्ज करतील आणि त्याची एक प्रत संबंधित कागदपत्रांच्या स्वाक्षांकित प्रतींसह आणि **'एम्केसीएल्' च्या नावाने काढलेल्या व पुणे येथे देय असलेल्या रू.६००/- च्या धनाकर्षासह [Demand Draft]** विहित मर्यादेपूर्वी पोहोचेल अशा बेताने मुख्य सचिव, जम्मू व काश्मीर शासन यांच्याकडे पाठवील. जम्मू व काश्मीर शासन उमेदवारांच्या विस्थापित स्थलांतर प्रमाणपत्राच्या पडताळणीची व्यवस्था पाहील आणि **फक्त विधीग्राह्य अर्जच जम्मू व काश्मीर राज्य शासन 'महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित,** आयसीसी ट्रेड टॉवर, 'बी' विंग, पाचवा मजला, क्रॉसवर्डच्या वर, सेनापती बापट रस्ता, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६, महाराष्ट्र**' यांच्याकडे पाठवील.**

(७) पदवी अभ्यासक्रमासाठी सर्व प्रवेश **गुणवत्तेनुसार आणि तात्पुरत्या स्वरुपाचे असतील.**

(८) **पोस्टाच्या किंवा कुरिअरच्या विलंबास कृषी परिषद, कृषी विद्यापीठ आणि 'मज्ञाम' जबाबदार राहणार नाही.**

(९) **http://oasis.mkcl.org/agriug** किंवा **www.mcaer.org या संकेतस्थळावर सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल**. उमेदवार या संकेतस्थळावर गुणवत्ता यादी पाहू शकतील. **उमेदवारांना टपाल किंवा दूरध्वनीद्वारे त्यांच्या गुणवत्तेबाबत कळविले जाणार नाही.**

(१०) गुणवत्ता यादीबाबत तक्रार असलेल्या अर्जदारांनी, प्रवेश कार्यक्रमामध्ये नमूद केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी त्यांच्या तक्रारी, प्रवेश अर्ज नोंदणीच्यावेळी त्यांना पुरविण्यात आलेल्या 'लॉगइन्

आय्‌डी' व 'पासवर्ड'च्या आधारे 'ऑन लाईन' सादर कराव्यात. **या मुदतीत उमेदवाराचा तक्रार अर्ज प्राप्त न झाल्यास त्याची/तिची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

(११) **उमेदवाराने त्याचा 'लॉग इन आय्‌डी' व 'पासवर्ड' वापरून संकेतस्थळावरून त्याला देण्यात येणाऱ्या तात्पुरत्या प्रवेश वाटप पत्राची मुद्रित प्रत प्राप्त करून घेऊन प्रवेश दिलेल्या महाविद्यालयात स्वतः सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रतींसह विहित दिनांकास अथवा त्यापूर्वी उपस्थित रहावे. अन्यथा असा उमेदवार प्रवेशासाठी अनुपस्थित राहिला असे समजण्यात येऊन त्याचा प्रवेश आपोआपच रद्द झाला आहे, असे समजण्यात येईल.**

(१२) (अ) प्रवेश माहिती पुस्तिकेत नमूद केलेल्या तारखेस उमेदवाराला उपलब्ध रिक्त जागांवर गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल.

**(ब) प्रवेशानंतर कोणत्याही वेळी, उमेदवाराने खोटी माहिती पुरवून प्रवेश घेतला आहे, असे आढळून आल्यास असा प्रवेश विद्यापीठ रद्द करील.**

(क) एखाद्या प्रकरणी विद्यापीठाने अशी कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आल्यास असा प्रवेश रद्द करण्यासाठी महासंचालक, कृषी परिषद हे सक्षम असतील.

(१३) (i) **उमेदवाराचा प्रवर्ग आणि / किंवा अतिरिक्त दिलेले गुण चुकीचे दर्शविले गेले असल्याचे,** प्रवेश घेतेवेळी मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रे यांच्या **छाननीच्या वेळी निदर्शनास आल्यास, असा उमेदवार प्रवेश मिळण्यास पात्र ठरणार नाही.**

(ii) सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी याबाबतची वस्तुस्थिती 'मज्ञाम' आणि कृषी परिषद यांना **ई-मेल, दूरध्वनी तसेच फॅक्सद्वारे तात्काळ कळवावी.**

(iii) 'मज्ञाम' द्वारा अंतिम यादी पुन्हा सुधारित करण्यात येईल आणि सदर उमेदवार त्याच्या सुधारित **गुणानुक्रमानुसार प्रवेशास पात्र राहील.**

(१४) (i) एखाद्या उमेदवाराला प्रवेशाबाबत तक्रार करायची असल्यास, **सात दिवसांच्या आत कृषी परिषदेचे महासंचालक** यांच्याकडे उमेदवार तक्रार अर्ज दाखल करू शकेल.

(ii) अशा तक्रारीबाबत तात्काळ शहानिशा करून यथायोग्य कार्यवाही करण्यास महासंचालक, कृषी परिषद हे सक्षम असतील.

(१५) पदवी अभ्यासक्रमासाठी घेतलेला प्रवेश अंतिम राहील. प्रवेश घेतलेला असा उमेदवार विद्यापीठ / महाविद्यालय / अभ्यासक्रम यामध्ये कोणताही बदल करण्यास पात्र राहणार नाही.

(१६) **कोणत्याही उमेदवाराची असा प्रवेश नाकारण्याची इच्छा असल्यास** आणि पुढील प्रवेश फेरीसाठी त्याचा/तिचा विचार व्हावा, असे वाटत असल्यास, त्याने / तिने **राज्यातील कोणत्याही घटक / अनुदानित महाविद्यालयात स्वतः प्रवेश नाकारण्यासाठीचा विहित नमुन्यातील अर्ज (<u>परिशिष्ट- 'के'</u>), रोख रु.२००/- इतके शुल्क भरून प्रवेश वाटप पत्रात नमूद केलेल्या अंतिम दिनांकास किंवा त्यापूर्वी सादर करावा.**

(१७) **एखाद्या विद्यार्थ्याने रु.२००/- फी भरुन त्याचा / तिचा प्रवेश नाकारला नाही, तर त्याचा / तिचा 'जागेवर प्रवेश फेरी' या फेरीखेरीज <u>नंतरच्या प्रवेश फेरीसाठी विचार केला जाणार नाही.</u>**

(१८) **प्रवेश रद्द केल्यानंतर शुल्काचा परतावा** :

(i) प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु होण्यापूर्वी विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास, विद्यार्थ्याकडून **प्रवेश प्रक्रिया शुल्कापोटी कमाल रू.१०००/- रक्कम कपात करण्यात येईल.**

(ii) **प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास वर्ग सुरु झालेल्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क** (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून **वसूल करण्यात येईल.**

(iii) वर्ग सुरु झाल्यानंतर राबविण्यात आलेल्या प्रवेश फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्याने नोंदणी करून प्रवेश रद्द केल्यास, **नोंदणी केलेल्या तारखेच्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.**

(१९) प्रवेश प्रक्रियेसंबंधीची तसेच राज्यस्तरीय ('एम' कोटा) व विद्यापीठस्तरीय ('यु' कोटा) ची गुणवत्ता यादी आणि प्रवेश फेऱ्यांप्रमाणे प्रवेशासंबंधीची सद्यस्थिती याबाबतची माहिती **<u>http://oasis.mkcl.org/agriug</u>** व **<u>www.mcaer.org</u>** या संकेतस्थळांवर उपलब्ध राहील.

(२०) महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांच्यासाठी महत्वाच्या सूचना **<u>परिशिष्ट 'एल्'</u>** येथे दिलेल्या आहेत.

(२१) उमेदवाराचा दुर्लक्षितपणा, दिरंगाई, कोणत्याही प्रकारचे तांत्रिक बिघाड किंवा त्याच्या इतर खाजगी कारणांमुळे तो प्रवेशापासून वंचित राहिल्याबाबत **कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

## ५. राखीव जागांचा तपशील.

महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ मधील तरतुदी, तसेच वेळोवेळी शासन निर्णयाद्वारे निर्देशित केल्याप्रमाणे विशिष्ट जागा, महाविद्यालयांमधील प्रवेशासाठी राखून ठेवण्यात आल्या आहेत-

| अ. क्र. | आरक्षण संवर्ग | टक्केवारी | अ. क्र. | इतर आरक्षण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | अनुसूचित जाती / नवबौध्द (एस्सी) | १३ | (८) | स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य (एफ्एफ्) | २ |
| (२) | अनुसूचित जमाती (एस्टी ) | ०७ | (९) | अपंग (कमी दिसणे, कमी ऐकणे, चालणे व्यंगत्व किंवा मणक्याचे व्यंगत्व) (पीएच) | ३ |
| (३) | विमुक्त जाती (अ) (व्हीजे -ए) (१४ व इतर) | ०३ | (१०) | आजी व माजी सैनिकांची मुले (डीपी) | २ |
| (४) | भटक्या जमाती (ब) (एन्टी-बी) (१९९० पूर्वीच्या सूचीप्रमाणे २८ व इतर) | २.५ | (११) | प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींची मुले. (पीएपी) महाराष्ट्र प्रकल्प पुनर्वसन अधिनियम, १९७६ प्रमाणे प्रकल्पपीडित. | ४ |
| (५) | भटक्या जमाती (क) (एन्टी - सी ) | ३.५ | (१२) | शेतकरी व विहित किमान अर्हता असलेले किंवा कृषीविषयक अनुभव असलेली शेतक-यांची मुले. (अेजी) | ६ |
| (६) | भटकया जमाती (ड) (एन्टी - डी) (वंजार, वंजारी, वंजारा) | ०२ | (१३) | ज्या तारखेला प्रवेश मागितला असेल त्या तारखेच्या लगतपूर्वीच्या १० वर्षे मुदतीमध्ये किमान तीन वर्षे ज्या व्यक्ती व ज्याच्या आईवडिलांनी या राज्यात निवास केलेला नसेल, अशा व्यक्ती. (ओएस) | २ |
| (७) | इतर मागास वर्गीय (ओबीसी) | १९ | (१४) | महिला | ३० |
| | एकूण | ५० | | | |

**टीप-**

(१) अ.क्र. ८ ते १२ हे आरक्षण खुला व आरक्षण संवर्गामध्ये गुणवत्तेनुसार समाविष्ट राहतील.

(२) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्रमांक अेजीयु -२१९५/सीआर -७३/१९-अे, दिनांक ३-१-२००१ नुसार **एकूण जागांच्या तीस टक्के जागा प्रत्येक संवर्गात महिला उमेदवारांसाठी आरक्षित आहेत.**

(३) घटनात्मक आरक्षणाबाबतचे प्रचलित नियम व अन्य आरक्षणे विनाअनुदानित महाविद्यालयांना लागू आहेत. ('ओएस' प्रवर्ग वगळून)

(४) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. पंदेकृवि-१००७/प्र.क्र.१६७७/७-अे, दि.४/१२/२००८ अन्वये **कृषी महाविद्यालय, सोनापूर जि.गडचिरोली येथे ८० टक्के जागा आदिवासी उमेदवारांसाठी राखीव आहेत.** (प्रत **परिशिष्ट 'एम्'** येथे जोडली आहे.)

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे वरील आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात येईल.

प्रवेश प्रक्रियेदरम्यान एखाद्या आरक्षित संवर्गामध्ये उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक, टीइएम - ३३९७ /१२९२६(९०८६)/टी - १, दिनांक ११-७-१९९७ च्या तरतुदीप्रमाणे भरण्यात येतील. सदर शासन निर्णय **परिशिष्ट- 'एन्'** येथे दर्शविण्यात आला आहे.

## ६. गुणाधिभार / अतिरिक्त गुण

विद्यापीठाच्या अभ्यासक्रमनिहाय प्रवेशासाठी उमेदवारास खालील प्रमाणे गुणाधिभार / अतिरिक्त गुण देण्यात येतील.

(१) पात्रता परीक्षेमध्ये मिळविलेल्या **एकूण गुणांची टक्केवारी मूळ गुण म्हणून (Points) धरण्यात येईल.**

(२) खालील व्यावसायिक / ऐच्छिक विषय / पदविकासह उमेदवार उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (१० + २ परीक्षा पध्दती) उत्तीर्ण झालेला असल्यास, खालील अतिरिक्त गुण लागू असतील.

| (अ) | **बी.एस्सी. (कृषी)** | **सांकेतांक** | **गुणाधिभार / अतिरिक्त गुण १०** |
|---|---|---|---|
| | (१) पशुविज्ञान व दुग्धव्यवसाय | बी-२ | |
| | (२) पीकशास्त्र | बी-४ | |
| | (३) उद्यानविद्या | बी-५ | |
| | (४) पीक उत्पादन | ७५ | |
| | (५) पशुविज्ञान | ७६ | |
| | (६) ग्रामीण कृषी विज्ञान संस्था अमरावती व वर्धा येथील पदविका | बी-१ | |
| | (७) कृषी शाळा पदविका (१२ वी परीक्षा पास झालेले) | डी-२ | |

**(ब) बी.एस्‌सी.(उद्यानविद्या) आणि बीएससी (वनशास्त्र)**

| | |
|---|---|
| (१) पीकशास्त्र | बी-४ |
| (२) उद्यानविद्या | बी-५ |
| (३) पीक उत्पादन | ७५ |
| (४) ग्रामीण कृषी विज्ञान संस्था अमरावती व वर्धा येथील पदविका | बी-१ |
| (५) कृषी शाळा पदविका (१२ वी परीक्षा पास झालेले) | डी-२ |

**(क) बीएफ्‌एस्‌सी (मत्स्यक्षेत्र)**

| | |
|---|---|
| (१) मत्स्य प्रक्रिया तंत्रज्ञान | बी-९ |
| (२) गोडया पाण्यातील मत्स्यबीज संवर्धन | सी-१ |

**(ड) बीटेक्‌ (कृषी अभियंत्रिकी)**

| | |
|---|---|
| (१) विद्युत परिरक्षण | अे-१ |
| (२) यांत्रिकी परिरक्षण | अे-२ |
| (३) सर्वसाधारण स्थापत्य अभियांत्रिकी | अे-४ |
| (४) कृषी यांत्रिकी | बी-३ |
| (५) इलेक्ट्रॉनिक्स | सी-२ |

**(इ) बीटेक्‌ ( अन्नशास्त्र)**

| | |
|---|---|
| (१) बेकरी व मिठाई | बी-७ |
| (२) अन्न साठविण्याची प्रक्रिया | बी-८ |
| (३) मत्स्य प्रक्रिया तंत्रज्ञान | बी-९ |

**(फ) बीएस्‌सी (गृहविज्ञान)**

| | |
|---|---|
| (१) पाककला | बी- ६ |
| (२) बेकरी व मिठाई | बी -७ |
| (३) अन्नसाठविण्याची प्रक्रिया | बी-८ |

**(ग) बी.बी.एम्‌. (कृषी)**

| | |
|---|---|
| (१) पुस्तपालन व लेखाकर्म | ५० |
| (२) पीक उत्पादन | ७५ |
| (३) पशु विज्ञान | ७६ |
| (४) पीकशास्त्र | बी-४ |

**(ह) बीएस्‌सी (कृषी जैवतंत्रशास्त्र)**

| | |
|---|---|
| (१) पीक उत्पादन | ७५ |
| (२) पशु विज्ञान | ७६ |
| (३) पशु विज्ञान आणि दुग्ध व्यवसाय | बी-२ |
| (४) शेतीयंत्रे / अवजारे | बी-३ |
| (५) पीकशास्त्र | बी-४ |
| (६) उद्यानविद्या | बी-५ |

(३) मत्स्य व्यवसाय करणाऱ्या कुटुंबातील किंवा शेती व्यवसाय करणाऱ्या कुटुंबातील उमेदवार, ज्यांची स्वतःची अथवा त्यांचे आई -वडील /आजी-आजोबांच्या (वडीलांकडून) नावे जमीन असल्याबाबत ७/१२ चा उतारा किंवा भूमिहीन शेतमजूर किंवा शेतकरी असल्याबाबतचे तहसीलदार यांचे प्रमाणपत्र. **१२ पॉईंटस्**

(४) राष्ट्रीय छात्रसेना 'बी' किंवा 'सी' प्रमाणपत्र /हवाईदल /सेना/नौदल विभागाचे प्रमाणपत्र /राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये किमान २४० तास काम केलेले / विशेष शिबीर केलेले प्रमाणपत्रधारक. **२ पॉईंटस्**

(५) आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय क्रीडापटूंना खालीलप्रमाणे अतिरिक्त गुण (Points) देण्यात येतील.

**<u>अधिभार गुणदान तक्ता</u>**

| अ.क्र. | स्पर्धेतील स्थान | क्रीडा स्पर्धानिहाय गुणदान | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आंतर-राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा | मान्यता प्राप्त संघटनेच्या | | भारतीय क्रीडा महासंघाच्या (S.G.F.I.) क्रीडा स्पर्धा | | |
| | | | राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा | राज्य अजिंक्यपद स्पर्धा | राष्ट्रीय | राज्य | जिल्हा |
| (१) | प्रथम | २५ | २० | १५ | २० | १५ | १० |
| (२) | द्वितीय | २० | १५ | १० | १५ | १० | ०५ |
| (३) | तृतीय | १५ | १० | ०५ | १० | ०५ | ०३ |
| (४) | सहभाग | १० | ०५ | ०३ | ०५ | ०३ | ०२ |

(६) राज्य कृषी विद्यापीठांतर्गत महाविद्यालय /संस्थांमध्ये आणि कृषी परिषद पुणे येथे प्रतिनियुक्तीवर काम केलेले आजी व माजी कर्मचारी यांचे पाल्य. **३ पॉईंटस्**

(७) वादविवाद, निबंध स्पर्धा, वक्तृत्व या राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये भाग घेतला असल्याबाबतचे प्रमाणपत्र. **२ पॉईंटस्**

**<u>२५ गुणांपेक्षा अधिकचा अधिभार अनुज्ञेय राहणार नाही.</u>**

## ७. शिक्षण पध्दती :

❖ राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये 'विषय - अधिभार पध्दती'ने प्रत्येक शैक्षणिक वर्ष दोन सत्रांमध्ये विभागले आहे आणि २० आठवडयांपेक्षा कमी कालावधी नसलेल्या कालावधीस 'षण्मासिक सत्र' असे म्हणतात.

- ❖ शैक्षणिक कार्यक्रमामध्ये शिकविले जाणारे विषय निरनिराळया सत्रांमध्ये विभागले जाऊन वर्गातील व्याख्यान, प्रात्याक्षिके / शेतावरील प्रात्यक्षिके, ग्रंथालयातील वाचन व गृहपाठ इत्यादीप्रकारे शिकविले जातात.
- ❖ विद्यार्थी / विद्यार्थिनी, विषयाची निवड, घ्यावयाचे एकूण अधिभार, विद्यार्थ्याच्या सल्ला समितीच्या मार्गदर्शनाखाली प्रचलित नियमाप्रमाणे आणि विद्यार्थ्यांची / विद्यार्थिनींची शैक्षणिक प्रगती पाहून करतो / करते.
- ❖ विद्यार्थ्याची / विद्यार्थिनींची शैक्षणिक प्रगती समाधानकारक नसेल तर तो काही विषय ज्या वेळी शिकविण्यासाठी उपलब्ध असतील त्या वेळी पुन्हा घेऊ शकतो / शकते.
- ❖ बी.एस्सी. (कृषि), बी.एस्सी. (उद्यानविद्या), बी.एस्सी. (वनशास्त्र) पदवीसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भारतीय कृषी शिक्षण व संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या चौथ्या अधिष्ठाता समितीच्या अहवालाच्या शिफारशीनुसार सातव्या सत्रांतर्गत दुसऱ्या रचनापरिमाणानुसार ग्रामीण कृषी कार्यानुभव (ग्राकृकार्या.) पूर्ण करावा लागतो.
- ❖ चौथ्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशीनुसार रोपण प्रशिक्षण / Hands on training इतर विद्याशाखांमधून सातव्या सत्रांतर्गत पूर्ण करावे लागते.

## ८. नोंदणी

प्रवेश अर्ज आणि मूळ प्रमाणपत्रे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी तपासल्यानंतर विद्यार्थ्यास नोंदणी करण्यासाठी परवानगी देण्यात येते आणि सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांचे कार्यालयात विद्यार्थी शुल्क भरतात .

## ९. वैद्यकीय तपासणी

- ❖ प्रथम वर्षात प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यास विद्यापीठ / सहयोगी अधिष्ठाता यांचे निर्देशानुसार जिल्हा शल्यचिकित्सक / ग्रामीण वैद्यकीय अधिकारी / प्राथमिक स्वास्थ्य केंद्र यांच्याकडून पहिले सत्र संपण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी करून घेणे अनिवार्य आहे.
- ❖ वैद्यकीय तपासणीत विद्यार्थ्यामध्ये व्यंग आढळून आल्यास महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता संबंधित विद्यार्थ्यास आणि त्याच्या आई - वडील / पालक यांना वैद्यकीय सुधारणेसाठी कळवतील.
- ❖ **विद्यार्थी वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरल्यास त्यास विद्यापीठातून काढून टाकण्यात येईल.**
- ❖ अशी प्रकरणे कुलसचिव यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात येतील.

- ❖ विद्यापीठ/ सहयोगी अधिष्ठाता यांनी आयोजित केलेल्या वैद्यकीय तपासणीसाठी विद्यार्थी गैरहजर राहिल्यास विद्यार्थ्याला स्वखर्चाने प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी करुन तपासणी अहवाल विहित केलेल्या मुदतीमध्ये महाविद्यालयास सुपूर्द करावा लागेल.
- ❖ **एखाद्या विद्यार्थ्याने वैद्यकीय तपासणी अहवाल विहित मुदतीत सादर केला नाही, तर अशा विद्यार्थ्याचा निकाल घोषित केला जाणार नाही.**

## १०. विद्यार्थी मार्गदर्शन पध्दत

सर्व महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक तथा इतर कार्यासंबंधी मार्गदर्शन करण्यासाठी समुपदेशन पध्दत अवलंबिली जाते. यामुळे त्याचा वैयक्तिक विकास होतो. विद्यार्थ्याचा समुपदेशक (पाल्य प्राध्यापक) विद्यार्थ्याच्या प्रगती विषयी जागरुक असतो.

## ११. उपस्थिती

- ❖ प्रत्येक विद्यार्थ्यास वर्गात, प्रात्यक्षिक , ग्रंथालयातील काम, विस्तार शिक्षण संबंधी भेटी, शैक्षणिक सहली आणि प्राध्यापक व संबंधीत शिक्षक यांच्या बैठकीस हजर राहाणे आवश्यक आहे.
- ❖ **एखाद्या विद्यार्थ्याची हजेरी ८० टक्यापेक्षा कमी असल्यास त्याला त्या सत्राची परीक्षा देण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल** व त्या विषयात अनुत्तीर्ण असा शेरा दिला जाईल (एफ् ग्रेड).
- ❖ अशा विद्यार्थ्यास त्या विषयासाठी पुन्हा नोंदणी करावी लागेल.

## १२. शैक्षणिक सहल.

पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक महाविद्यालयात निधी उपलब्ध झाल्यास, खालील प्रमाणे शैक्षणिक सहली आयोजित करण्यात येतात.

(१) व्दितीय वर्ष - महाराष्ट्र राज्य

(२) तृतीय वर्ष - दक्षिण भारत

(३) चतुर्थ वर्ष - उत्तर भारत

## १३. खेळ आणि इतर कार्यक्रम.

प्रत्येक महाविद्यालयात क्रीडा आणि त्यासंबंधी कार्यक्रम राबविण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

## १४. वसतीगृह

काही मर्यादित संख्येपर्यंत विद्यार्थ्यांसाठी काही महाविद्यालयांमध्ये वसतीगृहाची सोय उपलब्ध आहे. घटक महाविद्यालयात प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्याला वसतिगृहाची सोय उपलब्ध करुन देणे बंधनकारक किंवा आश्वासित नाही.

## १५. पदके, नगदी बक्षीसे आणि पारितोषिके.

निरनिराळया पदवी परीक्षांमधील उच्चतम गुणवत्ताधारक पदवी विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नियमानुसार पदके, नगदी बक्षीसे आणि पारितोषिके देण्यात येतात.

## १६. शिष्यवृत्ती आणि सवलती.

- घटक व संलग्न विना अनुदानित महाविद्यालयातील आरक्षित जागांवरील प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रचलित नियमानुसार भारत सरकार शिष्यवृत्ती,
- आर्थिकदृष्टया मागास घटकाच्या विद्यार्थ्यास फ्री शिप,
- भारत सरकारची राष्ट्रीय कर्ज शिष्यवृत्ती,
- अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता व साधने भारत सरकार शिष्यवृत्ती तसेच
- मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, गुणवत्ता व साधने शिष्यवृत्ती (महाराष्ट्र शासन)

इत्यादी शिष्यवृत्त्या दिल्या जातात.

## १७. वर्तणूक आणि शिस्त

(१) विद्यापीठामध्ये वेळोवेळी सुधारित व अस्तित्वात असलेल्या नियम व विनियमानुसार कॉपी प्रकरणे आणि गैरवर्तणुकीची प्रकरणे हाताळली जातात.

(२) विद्यापीठ संवैधानिक नियमावली, १९९० मध्ये केलेल्या तरतुदीन्वये **महाविद्यालयातील विद्यार्थी, रॅगिंग, अपहरण आणि इतर गैरशिस्तीच्या प्रकरणात आढळून आल्यास त्यास त्या महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता पूर्वसूचना न देता महाविद्यालयातून तसेच वसतिगृहातून ताबडतोब निलंबित करतील** आणि अशा विद्यार्थ्यास उप महासंचालक (शिक्षण), पत्र क्र. ६(२३)/२००७ ए व पी. दि.१८/१/०८ नुसार **मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी विशेष याचिका अपील (सी) (सन २००४ चे (सी) [२४२९५ व २४२९६-९९] मध्ये दि. १०/१२/२००१ रोजी दिलेले आदेश** आणि

डॉ.राघवन समितीच्या अहवालाच्या आधारे (डी.क्र. ३७०/०४/XI-अे, दि.२६/०२/२००९) व कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई पत्र क्र. अेजीयु-२००९/प्र.क्र.५८/७-अे, दि.६/५/२००९ नुसार, **माननीय कुलगुरु यांच्या आदेशाप्रमाणे महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.**

(३) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने केलेल्या नियम व विनियमांचे पालन करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील.

(४) **कोणत्याहीप्रकारची बेशिस्त किंवा गैरवर्तणूक ही रॅगिंगविरोधी कायदा, १९९९ च्या तरतुदीनुसार शिक्षापात्र गुन्हा ठरते.**

(५) रॅगिंगविरोधी कायदा : रॅगिंगच्या प्रकरणामध्ये २४ X ७ रॅगिंगविरोधी कायदेशीर मदत मिळण्यासाठी **१८००-१८०-५५२२** या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. ई-मेलः'**helpline@antiragging.net**' आणि संकेतस्थळ : '**http://www.ugc.ac.in**'

(६) प्रत्येक विद्यार्थी आणि त्याचे आई-वडील / पालक यांनी 'रॅगिंग विरोधी कायदा, १९९९ मधील तरतुदींचे आम्ही पालन करू,' असे **'परिशिष्ट ओ'** येथील हमीपत्र देणे गरजेचे आहे. तसेच आम्ही शैक्षणिक संस्थांमध्ये वसतीगृह परिसर आणि विद्यापीठ परिसरामध्ये शिस्त व वर्तणूक चांगली ठेऊ अशीदेखील खात्री देणे आवश्यक आहे.

## १८. शुल्क ¥

**पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी भरावयाच्या शुल्काचा तपशील (रुपयांमध्ये)**

| अ. क्र. | बाब | पदवी | |
|---|---|---|---|
| | | प्रथम सत्र | द्वितीय सत्र |
| | **अ) महाविद्यालय शुल्क** | | |
| १ | घटक व अनुदानित महाविद्यालयांसाठी शिक्षण शुल्क | ३०००<br>६०००Δ | ३०००<br>६०००Δ |
| | विना अनुदानित महाविद्यालयांसाठी शिक्षण शुल्क | १७५०० *<br>३२५०० ** | १७५०० *<br>३२५०० ** |
| २ | नोंदणी शुल्क | २०० | २०० |
| ३ | पात्रता शुल्क | १००<br>२०० $ | -- |
| ४ | महाविद्यालय तारण धन (caution money) | १०००© | -- |
| ५ | ग्रथांलय शुल्क | ४०० | ४०० |
| ६ | विद्यार्थी परिषदेच्या विविध बाबींसाठीची वर्गणी | | |
| | एक) खेळ,जिमखाना व इतर गतीविधी | ५०० | ५०० |
| | दोन) विद्यार्थी सहकारी संस्था (भांग भांडवल +सभासद शुल्क) | १०० # | -- |
| | तीन) वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ | २०० | -- |

| अ. क्र. | बाब | पदवी | |
|---|---|---|---|
| | | प्रथम सत्र | द्वितीय सत्र |
| | चार) महाविद्यालय नियतकालिक | २०० | -- |
| | पाच) अश्वमेध क्रीडा शुल्क | ३० | -- |
| ७ | विद्यापीठ वैद्यकीय तपासणी शुल्क | १०० | -- |
| ८ | ओळखपत्र | ५० # | -- |
| ९ | विद्यार्थी सहायता निधी | १०० # | -- |
| १० | श्रेणी पत्रिका शुल्क | १०० | १०० |
| ११ | परीक्षा शुल्क | १००० | -- |
| १२ | विद्यार्थी सुरक्षा विमा हप्ता | ६ | -- |
| | एकूण (अ) | ७०८६ + [४५०० Δ / १०० $ / १६००० * / ३१००० ** ] | ४२०० + [४५०० Δ / १६०००* / ३१०००** ] |
| | **(ब) वसतिगृह** | | |
| १ | वसतिगृह हमी अनामत | १०००© | -- |
| २ | देखभाल खर्च | १००० | १००० |
| ३ | विद्युत आकार | १००० | १००० |
| ४ | भोजनगृह अनामत | ६०० | -- |
| | एकूण (ब) | ३६०० | २००० |
| | एकूण (अ+ब) | ९१८६ + [४५०० Δ / १०० $ / १६००० * / ३१००० ** ] | ४७००+ [४५०० Δ / १६०००*/ ३१०००*] |

¥ प्रस्तुत शीर्षांतर्गत दर्शविण्यात आलेले शुल्क हे कृषी परिषदेच्या मान्यतेनुसार बदलण्यात येईल.

टीप- विनाअनुदानित महाविद्यालयातील व्यवस्थापन कोटयांतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी भरावयाचे शिक्षण शुल्क-

| विद्याशाखा | व्यवस्थापन कोटा |
|---|---|
| कृषी जैवतंत्रज्ञान आणि अन्नतंत्रज्ञान | जास्तीत जास्त रु.१,९५,०००/- प्रती वर्ष |
| इतर सर्व विद्याशाखा | जास्तीत जास्त रु.१,०५,०००/- प्रती वर्ष |

▼ एकत्रित श्रेणीपत्रक / गुणपत्रक शुल्क रु. १००/- इतके आठव्या सत्राच्या नोंदणीच्या वेळी ज्या त्या विद्यापीठाकडे जमा करावे लागेल.

Δ घटक महाविद्यालयातील बी.एससी.(कृषी जैवतंत्रज्ञान) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना आकारण्यात येणारे शुल्क.

$ इतर राज्यातील विद्यार्थ्यांनी भरावयाचे शुल्क.

* विना अनुदानित महाविद्यालयात बी.एस्सी. (कृषि) व संलग्न अभ्यासक्रमांसाठी भरावयाचे शुल्क.

** बी.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) आणि बी.टेक्. (अन्नतंत्रज्ञान) या अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क.

© विद्यार्थ्यांनी महाविद्यालय / वसतिगृह सोडतांना घ्यावयाची अनामत रक्कम.

\# हे शुल्क विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन काळात एकदाच भरावयाचे आहे. हे शुल्क RAWE / RHWE / RFWE इत्यादी उन्हाळी प्रशिक्षण किंवा कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आकारले जाणार नाही.

गुणपत्रिका / परीक्षा शुल्क संबंधित विद्यापीठात जमा करावे.

**टीप- महाराष्ट्र शासनाच्या सवलतीच्या नियमाप्रमाणे विद्यार्थीनी आणि राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणा-या सवलती या राज्य शासनाच्या वेळोवेळी सुधारित केलेल्या नियमाप्रमाणे दिल्या जातील.**

## १९. प्रवेश कार्यक्रम

पदवी प्रवेश प्रक्रियेचे सन २०११-२०१२ साठीचे वेळापत्रक.

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावयाचा अंतिम दिनांक | २५/०६/२०११ |
| २. | उमेदवाराने निवडलेल्या प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्राकडे अर्जाची मुद्रित प्रत अनुषंगिक धनाकर्ष व कागदपत्रांच्या सत्यप्रती प्राप्तीचा अंतिम दिनांक. | ३०/०६/२०११ |
| ३. | मज्ञाम व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अंतरिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | ०७/०७/२०११ |
| ४. | तक्रार नोंदणीचा अंतिम दिनांक. | १२/०७/२०११ |
| ५. | मज्ञाम व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | १५/०७/२०११ |
| ६. | पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | १८/०७/२०११ |
| ७. | दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | २४/०७/२०११ |
| ८. | तिसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. (रूपांतरासह) | **२८/०७/२०११** |
| ९. | चौथ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | ०२/०८/२०११ |
| १०. | **व्यवस्थापन कोटयांतर्गत प्रवेश** | ०५/०८/२०११ ते १२/०८/२०११ |
| ११. | जागेवर प्रवेश फेरी (**परिशिष्ट 'पी'** येथील कार्यपध्दतीनुसार) | १०/०८/२०११ ते १७/०८/२०११ |
| १२. | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | **०२/०८/२०११** |

**टीप -**

(१) **रविवारी तसेच शासकीय सुटीच्या दिवशीसुध्दा महाविद्यालयस्तरावर प्रवेश प्रक्रियाविषयक कार्यवाही चालू राहील.**

(२) **चौथ्या प्रवेश फेरीनंतर वेगवेगळया कारणास्तव रिक्त झालेल्या/असलेल्या जागा महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या अंतिम गुणवत्ता यादीनुसार 'जागेवर प्रवेश फेरी'द्वारे (Spot Admission System) संबंधित महाविद्यालयस्तरावर भरल्या जातील.**

(३) व्यवस्थापन कोटयांतर्गत प्रवेशासाठी वरील दिनांक लागू राहील. व्यवस्थापन कोटयांतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास संबंधित महाविद्यालयाने संबंधित विद्यापीठाकडून प्रवेश दिनांकापासून दहा दिवसांच्या आत मंजुरी घ्यावी. अशा मान्यतेबाबत कृषी परिषद कार्यालयास अवगत करण्यात यावे.

(४) **अनिवासी भारतीय उमेदवाराचे** गुणवत्ता यादीत नाव असल्याशिवाय ते प्रवेशास पात्र राहणार नाहीत.

(५) वर अधिसूचित केल्याप्रमाणे **प्रवेश प्रक्रियेकरिता वेगळे मुलाखत पत्र देण्यात येणार नाही.**

या माहिती पुस्तिकेमध्ये विविध पदवी प्रवेशाचे नियम तसेच शैक्षणिक नियमावलीच्या सर्व अभ्यासक्रमाची थोडक्यात माहिती देण्यात आली आहे. सविस्तर माहितीसाठी प्रवेशाचे नियम व विनियम तसेच शैक्षणिक नियमावली पहावी.

**२०. मझाम चे संकेतस्थळ ‘http://oasis.mkcl.org/agriug’ दि.३० मे,२०११ पासून कार्यरत राहील.**

**गणेश ठाकूर, भा प्र से**
**महासंचालक**
**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**
**पुणे-४११ ००७.**

## प्रवेशाकरिता तपासावयाच्या कागदपत्रांची सूची (Check List)

| अ.क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील | आहे (✓) / नाही (×) |
|---|---|---|
| (१) | महाराष्ट्र राज्यातील उमेदवार अथवा इतर राज्यातील विद्यार्थ्यांसाठीसुध्दा सक्षम प्राधिका-याचे **अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्मतारखेच्या दाखल्याची सत्यप्रत.** | |
| (२) | **उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेचे प्रमाणपत्र** (एच्एस्एस्सी- इ.१२ वी) **गुणपत्रक** किंवा गुणविवरणपत्र. | |
| (३) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेचे (एस्एस्सी- इ.१० वी) गुणपत्रक किंवा गुणविवरणपत्र. | |
| (४) | (अ) **महाविद्यालय सोडल्याचे / महाविद्यालय बदलीचे प्रमाणपत्र** (शेवटी शिकत असलेल्या) किंवा जेथे प्रवेश अगोदर मिळालेला आहे त्या महाविद्यालयाचे **बोनाफाईड** प्रमाणपत्र. | |
| | (ब) मागील शैक्षणिक वर्षात राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत पदवी शिक्षण घेत असलेल्या उमेदवारांसंदर्भात, चालू शैक्षणिक वर्षासाठी पहिल्या वर्षात प्रवेश घेण्याकरिता चालू शैक्षणिक वर्षापूर्वी प्रवेश घेतलेल्या **संबंधित महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र.** | |
| (५) | राज्यातील पदनिर्देशित सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले **'जात प्रमाणपत्र.'** | |
| (६) | राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले **'जात वैधता प्रमाणपत्र.'** | |
| (७) | **'उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र'** हे दि. १ एप्रिल,२०११ किंवा त्यांनतरचे ग्राह्य धरण्यात यावे. | |
| (८) | (अ) मा.पंतप्रधान / मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची स्वाक्षरी असलेले अर्जदाराच्या माता / पिता / आजी / आजोबा यांचे **'स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र'.** | |
| | (ब) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलाच्या / मुलीच्या, मुलाने / मुलीने **रु. १०० च्या मुद्रांकावर (रु. शंभर फक्त) प्रतिज्ञापत्र**. | |
| | (क) असल्यास, खालील बाबी नमूद करण्यात आलेल्या आहेत काय? | |
| | (१) उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाचा मुलगा / मुलगी किंवा त्यांच्या मुलाचा / मुलीचा मुलगा/ मुलगी आहे. | |
| | (२) स्वातंत्र्य सैनिकाने यापूर्वी कोणत्याही नातेवाईकासाठी ही सवलत घेतलेली नाही. | |
| | (३) यावेळी लाभ मिळाल्यास, यानंतर स्वातंत्र्य सैनिक कोणत्याही अन्य नातेवाईकासाठी ही सवलत घेणार नाही. | |
| (९) | **संरक्षण दलातील कर्मचारी** असल्याबाबतचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचे प्रमाणपत्र किंवा रेजिमेंटच्या समादेशक अधिकाऱ्याचे **प्रमाणपत्र** किंवा सक्षम प्राधिकाऱ्याचे 'सैनिक' असल्याबाबतचे प्रमाणपत्र. | |
| (१०) | सक्षम जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समतुल्य शासकीय रूग्णालय / वैद्यकीय मंडळाचे **'शारीरिक अपंगत्वाचे प्रमाणपत्र.'** | |

| | | |
|---|---|---|
| | [**विकलांगतेची टक्केवारी** शारिरीकदृष्टया अपंग प्रवर्गाकरिता आरक्षण मागणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत, **४० टक्क्यांपेक्षा कमी असता कामा नये.**] | |
| (११) | लाभार्थ्यांच्या नावे असणारी, विद्यार्थ्याच्या / विद्यार्थीनीच्या माता पित्याची अथवा आजोबा-आजीची जमीन कृषी विद्यापीठ / पाटबंधारे / वीज / संरक्षण प्रकल्प यासाठी शासनाने संपादित केली असल्याचे विहित नमुन्यातील महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्याने / पुनर्वसन अधिकाऱ्याने **'प्रकल्प विस्थापित व्यक्तीकरिता दिलेले प्रमाणपत्र (पीएपी.)'.** | |
| (१२) | उमेदवार किंवा त्याचे माता-पिता किंवा आजा-आजी (पित्याकडून) शेतजमिनीचे मालक किंवा कूळ म्हणून शेतजमीन धारक आहे / आहेत आणि त्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन जमिनीच्या वैयक्तिक मशागतीतून आहे हे दर्शविणारे तहसिलदार / नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ दर्जा नसलेल्या अधिका-याचे विहित नमुन्यातील **'शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (एजी)'.** | |
| (१३) | (i) विद्यार्थी / विद्यार्थीनीच्या नावे किंवा माता-पिता / आजोबा-आजीच्या नावे शेतजमीन आहे, हे दर्शविणारा तलाठी / पटवारी याने दिलेला **सन २००९-१० किंवा २०१०-११ वर्षाचा गाव ७/१२ उतारा / खसरा.**<br>(ii) माता-पिता हयात नसल्यास, अर्जदाराचा शेतजमिनीमध्ये कायदेशीर वाटा आहे असे नमूद करण्यात आलेले जमीन धारकाचे रू.२०/- च्या (वीस रुपये फक्त) मुद्रांकावर शपथपत्र जोडून उमेदवाराच्या भाऊ / चुलता यांचे नावे असलेला ७/१२ उतारा.<br>**(iii) हा उतारा मराठी/ हिंदी किंवा इंग्रजी भाषेमध्ये नसल्यास, प्रमाणित अनुवादाची प्रत सोबत जोडावी.**<br>(iv) उमेदवाराच्या आईच्या वडिलोपार्जित शेतजमिनीमध्ये तीचा हिस्सा असेल तर आईच्या पित्याचे रु.२०/- च्या (वीस रूपये फक्त) मुद्रांकावर केलेले शपथपत्र. | |
| (१४) | उमेदवाराच्या माता / पित्याचे उपजिविकेचे मुख्य साधन शेतजमिनीवरील शारीरिक श्रमाचे आहे, असा उल्लेख असणारे तहसिलदार / नायब तहसिलदाराचे **'भूमिहीन शेतमजुराचे प्रमाणपत्र'** (असे प्रमाणपत्र अर्जदाराच्या नावे नसावे.) तथापि, **अशा उमेदवारास 'शेतकरी' (एजी) प्रवर्ग लागू असणार नाही.** | |
| (१५) | उत्पन्नाचे साधन केवळ मच्छीमारी हाच व्यवसाय आहे, असा उल्लेख असणारे तहसिलदार / नायब तहसिलदाराचे **'मच्छिमार असल्याबाबतचे प्रमाणपत्र'**. | |
| (१६) | **राष्ट्रीय छात्रसेने**चे (एनसीसी) **'ब' किंवा 'क' प्रमाणपत्र** किंवा समादेशक अधिकाऱ्याचे (वायु /नौसेना / सैन्यदल) प्रमाणपत्र (अकरावी किंवा बारावी इयत्तेमध्ये उत्तीर्ण झालेले). | |
| (१७) | (अ) अर्जदाराने महाविद्यालयात इयत्ता **अकरावी आणि / किंवा बारावी मध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य, जिल्हा क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र**.<br>तसेच आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांबाबत आयोजकांतर्फे संबंधित सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र. | |

| | | |
|---|---|---|
| | (ब) आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा- (i) ऑलिम्पिक गेम्स,<br>(ii) कॉमनवेल्थ गेम्स.<br>(iii) कॉमनवेल्थ युथ गेम्स.<br>(iv) आशियाई क्रीडा स्पर्धा.<br>(क) राष्ट्रीय/राज्य/जिल्हा क्रीडा स्पर्धा : (i) मान्यताप्राप्त क्रीडा संघटनेतर्फे आयोजित व भारतीय ऑलिम्पिक महासंघ पुरस्कृत क्रीडा स्पर्धा.<br>(ii) भारतीय शालेय क्रीडा महासंघातर्फे (School Game Federation of India) आयोजित क्रीडा स्पर्धा. | |
| (१८) | कनिष्ठ महाविद्यालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे **'एनएसएस (राष्ट्रीय सेवा योजना) प्रमाणपत्र'**. | |
| (१९) | **महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद / कृषी विद्यापीठ यांच्या कर्मचाऱ्यांचा पाल्य असल्याचे प्रमाणपत्र.** | |
| (२०) | वादविवाद, निबंध स्पर्धा, वक्तृत्व या **राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये भाग घेतला असल्याबाबतचे प्रमाणपत्र**. | |
| (२१) | कृषीविज्ञान किंवा ग्रामीण संस्था, अमरावती किंवा वर्धा येथील **पदविका गुणपत्रक / प्रमाणपत्र.** | |
| (२२) | कृषी तंत्र शाळेतील गुणपत्रक / प्रमाणपत्र. | |
| (२३) | आर्थिकदृष्टया मागास वर्गातील उमेदवारांकडे संबंधित तहसीलदारांचे दि.१ जानेवारी,२०११ रोजी किंवा त्यानंतर दिलेले **'आर्थिक मागास वर्गाचे प्रमाणपत्र'**.<br>(सदरची सवलत फक्त केंद्रीय प्रवेश पध्दतीने विना अनुदानित महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांस लागू आहे.) | |
| (२४) | जम्मू व काश्मीर राज्यातील **स्थलांतरित / विस्थापित विद्यार्थी,** शासन निर्णय क्र.एजीयु-२०९५/ २३१०६/ सीआर-१८१/१९-अे, दि. ५/९/१९९६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याचे **प्रमाणपत्र**. विस्थापिता संबंधीचे शपथपत्र विचारात घेतले जाणार नाही. | |
| (२५) | सेवेत असलेले उमेदवार असल्यास संबंधित कार्यालय प्रमुखाचे **'ना हरकत प्रमाणपत्र'.** | |
| (२६) | स्वच्छताविषयक सुविधांबाबत **परिशिष्ट 'आय'** मधील हमीपत्र. | |

सर्व बाबतीतील परिपूर्ण अर्ज आणि अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकाला किंवा त्यापूर्वी मिळालेल्या अर्जांचाच फक्त प्रवेशासाठी विचार केला जाईल.